CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आत्मनिर्भर इन्व्हेस्टर्सचे सशक्तीकरण



आत्मविश्वासू आणि आत्मनिर्भर
इन्व्हेस्टर्सच्या राष्ट्राची निर्मिती

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आत्मनिर्भर इन्व्हेस्टर्सचे सशक्तीकरण

सीडीएसएलच्या

**सुविधाजनक** **विश्वासार्ह** **सुरक्षित**

डिमॅट खात्यांसह

सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ही भारतातील पहिली आणि एकमेव सूचीबद्ध डिपॉझिटरी आहे जी विश्वसनीय आणि सुरक्षित डिजिटल सेवांसह देशभरातील इन्व्हेस्टरना सशक्त बनवण्यासाठी समर्पित आहे.




अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

आत्मनिर्भर इन्व्हेस्टर बनण्यासाठी

# एक डिजिटल टूलकिट




अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# डिमॅट खाती

'डिमॅट खाते' (डिमटेरिअलाईज्ड खाते) ही ट्रेडिंग आणि गुंतवणुकींमध्ये सामान्यपणे वापरली जाणारी संज्ञा आहे. हे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा संदर्भ देते, ज्याद्वारे इन्व्हेस्टर सुरक्षितपणे शेअर्स धारण करू शकतात, ट्रेड आणि मॉनिटर करू शकतात, सुरळीत आणि कार्यक्षम व्यवहार सुनिश्चित करू शकतात.

**इन्व्हेस्टर्स त्यांच्या डिमॅट खात्यामध्ये डिपॉझिटरीमध्ये ॲडमिट केलेल्या सर्व सिक्युरिटीज धारण करू शकतात.**




**सूचीबद्ध आणि सूचीबद्ध नसलेल्या दोन्ही सिक्युरिटीज**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# मला डिमॅट खात्याची आवश्यकता का आहे?

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात शेअर्स आणि सिक्युरिटीज धारण करण्याचा सुरक्षित आणि सोपा मार्ग म्हणून,

- फसवणूक, चोरी किंवा कागद-आधारित सिक्युरिटीजचे नुकसान यामुळे उद्भवणाऱ्या जोखीमांना दूर करते.

- सर्वांसाठी एकच खाते
  - एकाच खात्याद्वारे तुमच्या सर्व गुंतवणुकींचा मागोवा ठेवा.
  - ऑड लॉट: अगदी एकाच शेअरची खरेदी किंवा विक्री करा.

- व्यवहार प्रक्रिया आणि सेटलमेंटसाठी कमी खर्च आणि वेळ. तुम्ही कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय मोठ्या प्रमाणात सिक्युरिटीज कार्यक्षमतेने स्टोअर करू शकता आणि व्यवहार करू शकता.

- नवीनतम सेबी मार्गदर्शक तत्त्वांनुसार, तुम्ही प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमॅट स्वरूपात शेअर प्रमाणपत्र सारख्या सिक्युरिटीज धारण करण्याचा ऑप्शन निवडू शकता. तथापि, एप्रिल 01, 2019 पासून, जर त्या डिमॅट स्वरूपात धारण केल्या असतील तरच सिक्युरिटीज ट्रान्सफर केल्या जाऊ शकतात.

- लाभांश, रिफंड किंवा व्याजासारखे कॉर्पोरेट ॲक्शन लाभ डिमॅट खातेधारकांसाठी ऑटोमॅटिकरित्या उपलब्ध आहेत. बोनस इश्यू, राईट शेअर्स किंवा स्टॉक स्प्लिट ऑटोमॅटिकरित्या डिमॅट खात्यात अपडेट केले जातात.

# डिमॅट खाते नंबर

प्रत्येक डिमॅट खात्याचा स्वत:चा युनिक 16 अंकी डिमॅट खाते नंबर आहे, जो लाभार्थी मालक आयडी किंवा बीओ आयडी म्हणूनही ओळखला जातो.

सीडीएसएलच्या बाबतीत, हे डीपी आयडी (पहिले 8 अंक) आणि ग्राहक आयडी (शेवटचे 8-अंक) चे कॉम्बिनेशन आहे.

बीओ आयडीची सुरुवात नंबरसह होते, म्हणजेच

**12010000 00000001**

**डीपी आयडी** — **ग्राहक आयडी**

तुमच्या सीडीएसएल डिमॅट खात्यात तुम्ही ठेवू शकणाऱ्या सिक्युरिटीजची यादी: यादी जाणून घेण्यासाठी येथे क्लिक करा
https://www.cdslindia.com/eservices/Investors/InvestorCorner

# डिपॉझिटरी

डिपॉझिटरीज सिक्युरिटीज डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात ठेवण्यास सुलभ करतात आणि सिक्युरिटीजमध्ये व्यवहार करण्यास सक्षम करतात.

डिपॉझिटरी ही सिक्युरिटीजसाठी बँक सारखी आहे जी इन्व्हेस्टरना त्यांच्या नोंदणीकृत डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) (जसे की बँकांच्या शाखा) द्वारे डिमॅट सेवा प्रदान करते.

डिपॉझिटरीद्वारे ऑफर केलेल्या सेवांचा लाभ घेण्यासाठी, इन्व्हेस्टरला नोंदणीकृत डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) सह डिमॅट खाते उघडावे लागेल. जे इन्व्हेस्टरना डिमॅट खाते उघडणे आणि मेंटेन करणे, शेअर्सचे डिमटेरिअलायझेशन, शेअर्सचे ट्रान्सफर, शेअर्सचे प्लेजिंग, खाते फ्रीझ करणे इ. सारख्या विविध सेवा प्रदान करतात.

**डीपींची यादी**
https://www.cdslindia.com/eservices/DP/DPlist

# सीडीएसएल

1999 मध्ये सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ची स्थापना या एका ध्येयपूर्तीसाठी केली गेली: सोयीस्कर, विश्वासार्ह आणि सुरक्षित डिपॉझिटरी सेवा. दोन दशकांहून अधिक काळानंतर, आम्ही केलेल्या सर्व गोष्टींनी - आम्ही निर्माण केलेल्या मूल्यांपासून ते विविध मालमत्ता वर्ग आणि ई-सेवांचे डिमटेरिअलायझेशन पर्यंत - या एकमेव ध्येयाला परवडणाऱ्या खर्चात पाठिंबा दिला आहे.

आम्ही मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर इन्स्टिट्यूशन (एमआयआय) आणि कॅपिटल मार्केट स्ट्रक्चरचा महत्त्वाचा भाग आहोत, जे सर्व मार्केट सहभागींना सेवा प्रदान करते - एक्सचेंज, क्लिअरिंग कॉर्पोरेशन्स, डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी), इश्यूअर्स आणि इन्व्हेस्टर्स.

आर्थिकदृष्ट्या सुरक्षित भविष्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या सीडीएसएलच्या सेवांसह **#AtmanirbharInvestor** बनण्याचा पर्याय निवडा.

# खाते उघडणे

## सीडीएसएल डिमॅट खाते कसे उघडावे

**सीडीएसएलच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटशी (डीपी) संपर्क साधा**

**ते प्रदान करत असलेल्या सेवा आणि तुमच्या सोयीनुसार त्यांची निवड करा**

**तुमचे केवायसी तपशील सादर करा:**
- **ओळखीचा पुरावा - पॅन**
- **पत्त्याचा पुरावा - बँक तपशील**

केवायसी (नो युवर कस्टमर) प्रक्रियेसाठी अतिरिक्त दस्तऐवज प्रदान करा. सोयीस्कर, विश्वासार्ह आणि नोंदणीकृत डीपी मार्फत डिमॅट खाते उघडून गुंतवणुकीच्या जोखमी कमी करा.

सीडीएसएल डीपीजची यादी
https://www.cdslindia.com/eservices/DP/DPlist

एकदा का तुम्ही तुमची निवड केली की, तुम्हाला तुम्ही निवडलेल्या डीपीच्या माहितीपूर्ण पेजवर नेले जाईल. पेज डीपी आणि सेवा केंद्रांच्या टॅरिफ संरचनेविषयी माहिती देईल. डीपी टॅरिफ संरचनांची तुलना करून माहितीपूर्ण निर्णय घ्या.

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# खाते उघडणे

बना #AtmanirbharInvestor




## काय करावे

- स्वाक्षरी करण्यापूर्वी खाते उघडण्याचा अर्ज काळजीपूर्वक वाचा.
- अलर्ट प्राप्त करण्यासाठी डिमॅट खाते उघडताना तुमच्या स्वत:च्या ईमेल आयडी आणि मोबाईल नंबरसह नोंदणी करा.
- बँक तपशील योग्यरित्या अपडेट केल्याची आणि तुमच्या डिमॅट खात्यासह लिंक असल्याची खात्री करा (कारण लाभांश आणि रिडेम्प्शन्स थेट तुमच्या बँक खात्यात जमा केले जातील).

## काय करू नये

- नोंदणीकृत नसलेल्या मध्यस्थांशी डील करू नका.
- तुमचे डिमॅट खाते क्रेडेन्शियल (पासवर्ड) कोणासोबतही शेअर करू नका.
- डिमॅट शुल्कासाठी कॅश देयक टाळा. भविष्यातील विवादांच्या बाबतीत ट्रेल चिन्हांकित करण्यासाठी चेक, इंटरनेट बँकिंग सारखे पर्याय निवडा.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

INVESTOR PROTECTION FUND TRUST

# नॉमिनेशन

बना #AtmanirbharInvestor



## काय करावे

- नेहमीच तुमच्या डिमॅट खात्यात नॉमिनी नियुक्त करा.
- केवळ वैयक्तिक खातेधारक नॉमिनेट करू शकतात.
- खाते कार्यरत होईपर्यंत तुम्ही नॉमिनी जोडू/बदलू शकता.
- एकल/जॉईंट धारक नॉमिनी नियुक्त करू शकतात.
- तुमच्याकडे डिमॅट खात्यासाठी कमाल 3 नॉमिनी असू शकतात.
- पालकांनी प्रतिनिधित्व केलेले अल्पवयीन नॉमिनी म्हणून नियुक्त केले जाऊ शकतात.

## काय करू नये

- गैर-वैयक्तिक नॉमिनेट करू शकत नाहीत किंवा नॉमिनी म्हणून नियुक्त केले जाऊ शकत नाहीत.
- पीओएधारक नॉमिनी जोडू/बदलू शकत नाहीत.
- अल्पवयीन खातेधारक नॉमिनी नियुक्त करू शकत नाहीत.
- एकल / जॉईंट धारक स्वत:ला नॉमिनी म्हणून नॉमिनेट करू शकत नाहीत.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# डिमॅट डेबिट अँड प्लेज इंस्ट्रक्शन (डीडीपीआय)

बना #AtmanirbharInvestor



डीडीपीआय हे पर्यायी दस्तऐवज स्टॉक ब्रोकर/ डिपॉझिटरी पार्टिसिपंटला बीओ द्वारे अंमलात आणलेल्या ट्रेडच्या सेटलमेंटसाठी पे-इन दायित्वे पूर्ण करण्याच्या मर्यादित उद्देशासाठी डिमॅट खाते ॲक्सेस करण्यास अधिकृत करते.

डीडीपीआय पीओएचा समान उद्देश पूर्ण करेल आणि पीओएचा गैरवापर लक्षणीयरित्या कमी करेल.

डीडीपीआय खालील उद्देशांसाठी वापरले जाऊ शकते:

- तुम्ही ट्रेड केलेले स्टॉक तुमच्या ब्रोकरद्वारे पे-इनसाठी डेबिट केले जाऊ शकतात.
- शेअर्स मार्जिनसाठी तारण ठेवता येतात.
- जर तुम्ही त्यामध्ये सहभागी झालात तर बायबॅकसाठी म्युच्युअल फंड
- युनिट्स रिडीम केले जाऊ शकतात किंवा शेअर्स डेबिट केले जाऊ शकतात.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# SMART सुविधा
## (एसएमएस अलर्ट्स रिलेटेड टू ट्रान्झॅक्शन्स)

बना #AtmanirbharInvestor




## काय करावे

- नेहमीच तुमच्या सीडीएसएल डिमॅट खात्यात तुमचा मोबाईल नंबर अपडेट करा.
- सीडीएसएलच्या "SMART" सुविधेसाठी नोंदणी करा जे तुम्हाला डेबिट आणि कॉर्पोरेट ॲक्शन क्रेडिटसाठी एसएमएस अलर्ट प्राप्त करण्यास सक्षम करते.
- तुमच्या डिमॅट खात्यामध्ये ऑफ-मार्केट किंवा मार्जिन प्लेज व्यवहाराच्या बाबतीत ओटीपीसाठी तुमचे मोबाईल मेसेज (एसएमएस) तपासा.

## काय करू नये

- मोबाईल नंबरमध्ये बदल झाल्यास तुमचे डिमॅट खाते अपडेट करण्यास विसरू नका.
- डिमॅट खाते व्यवहारांसाठी ओटीपी कधीही शेअर किंवा फॉरवर्ड करू नका.
- तुमच्या डिमॅट खात्यात केलेल्या अनधिकृत डेबिटसाठी कोणत्याही सीडीएसएल एसएमएस अलर्टकडे दुर्लक्ष करू नका आणि त्वरित तुमच्या डीपीशी संपर्क साधा.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# तुमचे सीडीएसएल डिमॅट खाते तपशील अपडेट करा

बना #AtmanirbharInvestor



## काय करावे

- पत्यात बदल किंवा बँक खात्याच्या तपशीलात बदल झाल्यास ताबडतोब तुमच्या डीपीला कळवा.
- तुमच्या नवीनतम ईमेल आयडी आणि मोबाईल नंबरसह तुमचे सीडीएसएल डिमॅट खाते नेहमीच अपडेटेड ठेवा.
- इश्यूअर/आरटीए सह तुमचा ईमेल आयडी शेअर करण्यासाठी संमती देऊन 'गो-ग्रीन' धोरणाचे अवलंबन करा आणि ई-नोटीस, वार्षिक अहवाल ईमेलवर त्वरित प्राप्त करा.

## काय करू नये

- जर तुम्हाला तुमच्या अपडेटेड ईमेल आयडी किंवा मोबाईल फोन नंबरवर व्यवहार विवरण/एसएमएस अलर्ट प्राप्त झाले नाही, तर तुमच्या डीपीशी संपर्क साधण्यास विलंब करू नका.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

easi

'easi' (इलेक्ट्रॉनिक ॲक्सेस टू सिक्युरिटीज इन्फॉर्मेशन) ही मागील 30 दिवसांचे आणि आर्थिक वर्षाचे (365 दिवस) व्यवहार आणि रेकॉर्ड विवरण पाहण्यासाठी आणि प्रिंट करण्यासाठी इंटरनेट-आधारित सुविधा आहे.

- तुमचे डिमॅट खाते मॉनिटर करा आणि प्रोफाईल एडिट करा.
- व्यवहार, होल्डिंग्स आणि मागील आर्थिक वर्षांचे विवरण पाहा आणि प्रिंट करा.
- नवीनतम मूल्यांकनासह अपडेटेड राहा.
- सिंगल लॉग-इन आयडीसह एकाधिक डिमॅट खाती पाहा.
- कन्सॉलिडिटेड अकाउंट स्टेटमेंट (सीएएस) चा ॲक्सेस.
- ई-दस्तऐवज सुरक्षितपणे स्टोअर आणि शेअर करण्यासाठी ई-लॉकर सुविधा प्राप्त करा.
- कॉर्पोरेट घोषणांचे मॉनिटरिंग - तुमच्या डिमॅट खात्यात धारण न केलेल्या 25 पर्यंत आयएसआयएन जोडण्याचा ऑप्शन.

MyEasi

येथे उपलब्ध असेलेले Myeasi मोबाईल ॲप डाउनलोड करा GET IT ON Google Play | Download on the App Store

https://web.cdslindia.com/myeasitoken/Home/Login

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

easiest

easiest (इलेक्ट्रॉनिक ॲक्सेस टू सिक्युरिटीज इन्फॉर्मेशन अँड एक्झिक्युशन ऑफ सिक्युअर्ड ट्रान्झॅक्शन्स) ही सीडीएसएलद्वारे मॉनिटर आणि व्यवहार करण्यासाठी इंटरनेट-आधारित सुविधा आहे.

easi च्या सर्व सुविधा आणि लाभ.

easi आणि easiest वापरकर्त्यांसाठी सीडीएसएलच्या Myeasi ॲपसह त्रासमुक्त ॲक्सेस.

व्यवहार मॉनिटर | सेट | फ्रीझ | अनफ्रीझ करा.

बीओ द्वारे सूचना सादर करण्यास सुविधा देते.

यापूर्वीच easi सदस्य आहात? easiest वर अपग्रेड करा.

## easiest वर उपलब्ध असलेले दोन प्रकारचे खाते ट्रान्सफर

- **विश्वसनीय खाते ट्रान्सफर:**
  बीओ खात्यातून बीओच्या निवडीच्या कोणत्याही 4 पूर्व-अधिसूचित सीडीएसएल डिमॅट खात्यात सिक्युरिटीज ट्रान्सफर.

- **निवडीचे खाते - ट्रान्सफर:**
  डिजिटल स्वाक्षरीद्वारे सीएम सेटलमेंट खात्यासह बीओ खात्यामधून इतर कोणत्याही डिमॅट खात्यामध्ये सिक्युरिटीज ट्रान्सफर करण्याची परवानगी देते.

सीडीएसएलच्या EASIEST सुविधेसह सुरक्षितपणे मॉनिटर करा आणि व्यवहार करा

https://web.cdslindia.com/myeasitoken/Home/Login

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

# डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप (डीआयएस)

बना #AtmanirbharInvestor



## काय करावे

- रिक्विझिशन स्लिप आणि स्लिपचा सीरिअल नंबर क्रम राखला आहे याची खात्री करा.
- स्लिपवरील कोणतीही रिकामी जागा खोडा.
- डीआयएस बुक नेहमी सुरक्षित ठेवा.
- सर्व ऑफ मार्क व्यवहारांचे कारण, मोबदला रक्कम आणि मोबदल्याचे तपशील निर्दिष्ट करा.

## काय करू नये

- प्रत्येक स्लिपवर तिचा सीरिअल नंबर आणि तुमचा डिमॅट अकाउंट नंबर आधीच प्रिंट केलेला नसल्यास डीपीकडून डीआयएस बुक स्वीकारू नका.
- तुमची स्वाक्षरी केलेली डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप कोणाकडेही सोडू नका कारण ती बेअरर चेकच्या समतुल्य आहे.

(डीआयएस हे तुमच्या डिमॅट खात्याच्या चेकबुकप्रमाणे आहे)

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

# e-Voting

सीडीएसएलची ईव्होटिंग प्रणाली शेअरधारक/सदस्यांना ईव्होटिंग इव्हेंट बंद होईपर्यंत कंपनीच्या ठरावांवर दूरस्थपणे त्यांचे इलेक्ट्रॉनिक व्होट देण्यास सक्षम करते.

एजीएम/ईजीएमच्या वेळेपूर्वी किंवा दरम्यान शेअरधारक www.evotingindia.com वर त्यांचे व्होट देऊ शकतात.

तुमच्या सोयीच्या ठिकाणी आणि वेळी कॉर्पोरेट निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हा.

व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) द्वारे एजीएम/ईजीएमला उपस्थित राहा.

तुम्ही तुमच्या डीपीच्या ऑनलाईन पोर्टलवरून ई-व्होटिंग करू शकता किंवा डिपॉझिटरी वेबसाईटवरील ई-व्होटिंग टॅबवर क्लिक करू शकता.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

# डिमटेरिअलायझेशन (डिमॅट)

बना #AtmanirbharInvestor




## काय करावे

- यासाठी नेहमीच स्वतंत्र डिमॅट विनंती अर्ज (डीआरएफ) भरा,

  i. मोफत आणि लॉक-इन केलेल्या सिक्युरिटीज,
  ii. प्रत्येक आयएसआयएन,
  iii. विविध कारणांसाठी लॉक-इन केलेल्या सिक्युरिटीज,
  iv. वेगवेगळ्या पेड-अप मूल्यांच्या सिक्युरिटीज आणि
  v. प्रत्येक ग्राहक खात्यासाठी.

- सर्व डिमॅट खातेधारकांनी डीपी आणि इश्यूअर/आरटीए सह रेकॉर्ड केलेल्या नमुना स्वाक्षरीनुसार डीआरएफवर स्वाक्षरी केल्याची खात्री करा.

## काय करू नये

- डिमॅटसाठी सिक्युरिटीज पाठवण्यापूर्वी पाठवलेल्या सिक्युरिटीजची विशिष्ट संख्या रेकॉर्ड करण्यास विसरू नका.
- डिमॅटसाठी विनंती पाठवण्यापूर्वी आयएसआयएन ॲक्टिव्ह आहे का हे डबल-चेक करण्यास विसरू नका.
- डिमॅटसाठी पाठवण्यापूर्वी प्रलंबित डिमॅट विनंतीसह कंपनी टॉप 200 कंपन्यांमध्ये आहे का हे तपासण्यास विसरू नका.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

eCAS

सीडीएसएलचे कन्सॉलिडिटेड अकाउंट स्टेटमेंट (सीएएस) इन्व्हेस्टरच्या सर्व आर्थिक सिक्युरिटीजचे एकत्रित दृश्य प्रदान करते म्हणजेच ते सीडीएसएल आणि एनएसडीएलकडे धारण केलेल्या डिमॅट खात्यांमधील व्यवहार आणि होल्डिंग्स तसेच म्युच्युअल फंड (एमएफ) द्वारे जारी केलेल्या स्टेटमेंट ऑफ अकाउंट (एसओए) अर्जामध्ये नमूद केलेल्या व्यवहार आणि होल्डिंग्सचे एकल खाते विवरण असते.

डिमॅट आणि एमएफमधील गुंतवणुकींचे एकत्रित दृश्य.

जर कोणताही व्यवहार नसेल तर अर्ध-वार्षिक होल्डिंग विवरण.

डिमॅट किंवा एमएफमध्ये कोणत्याही व्यवहाराच्या बाबतीत मासिक विवरण.

ईसीएएस सेवा प्राप्त करण्यासाठी तुमच्या डिमॅट खाते/एमएफ फोलिओमध्ये तुमचा ईमेल आयडी आणि सीएएस मोड अपडेटेड ठेवा.

- पर्मनंट अकाउंट नंबर (पॅन) वर आधारित सीएएस प्रदान केले जाते. एकाधिक होल्डिंगच्या बाबतीत, ते पहिल्या धारकाच्या पॅन आणि होल्डिंगच्या पॅटर्नवर आधारित आहे.

- सीएएस डिफॉल्ट डिपॉझिटरीद्वारे पाठविले जाते (डिपॉझिटरी जेथे डिमॅट खाते आधी उघडले गेले आहे)
- इन्व्हेस्टर 23 विविध भारतीय भाषांच्या निवडीतून त्यांच्या प्राधान्यित भाषेत ईसीएएस प्राप्त करू शकतात.

सीडीएसएलचे ईसीएएस हे ईमेलद्वारे इंटरॲक्टिव्ह सीएएस विवरण आहे, जे जलद, स्टोअर आणि पुन्हा प्राप्त करण्यास सोपे आणि पासवर्ड संरक्षित आणि इको-फ्रेंडली आहे. आत्ताच ईसीएएससाठी तुमच्या डीपीशी संपर्क साधा.

आत्ताच तुमचे सीडीएसएल सीएएस डाउनलोड करा :
https://www.cdslindia.com/CAS/LoginCAS.aspx

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# तक्रार निवारण

सीडीएसएलची तक्रार निवारण सुविधा इन्व्हेस्टरला सहाय्य मिळवण्याची अनुमती देते आणि त्वरित तपासणीसह इन्व्हेस्टरच्या तक्रारींचे निवारण प्रदान करते.

तुमच्या तक्रारीच्या तपशिलासह तुमच्या डीपी/ इश्यूअर कंपनी/ आरटीएशी त्वरित संपर्क साधा.

जर तक्रारीचे निराकरण झाले नाही तर तुम्ही सीडीएसएलच्या तक्रार निवारण सेलशी संपर्क साधू शकता. https://www.cdslindia.com/eservices/footer/grievances

अद्याप समाधानी नसल्यास, स्कोअर्स-सेबी तक्रार निवारण प्रणालीवर तक्रार दाखल करा https://scores.sebi.gov.in/

जर इन्व्हेस्टर डीपी किंवा इतर मार्केट सहभागींद्वारे प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल तर इन्व्हेस्टरकडे ऑनलाईन समाधान किंवा आर्बिट्रेशनद्वारे त्याच्या निराकरणासाठी SMARTODR प्लॅटफॉर्मवर तक्रार दाखल करण्याचा ऑप्शन आहे. https://smartodr.in/login

करार, पत्रे, ईमेल, फॅक्स इ. सारख्या तुमच्या डिमॅट खात्याशी संबंधित दस्तऐवजीकरणाच्या प्रती नेहमीच तुमच्याकडे ठेवा.

त्वरित कृती करा आणि तक्रार निवारणासाठी संबंधित प्राधिकरणाशी संपर्क साधा.

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# इन्व्हेस्टर जागरूकता

सीडीएसएल इन्व्हेस्टर्सना डिपॉझिटरी, कॅपिटल मार्केट प्रॅक्टिस आणि इन्व्हेस्टरच्या हक्क आणि दायित्वांविषयी शिक्षित करून सशक्त करते. यासाठी, सीडीएसएल नियमितपणे त्यांच्या डीपीज, एक्सचेंज, आर्थिक / शैक्षणिक संस्था, मीडिया इ. सह इन्व्हेस्टर अवेअरनेस प्रोग्राम्स (आयएपी) आयोजित करते.

FREE

या आयएपीमध्ये सर्व व्यक्तींसाठी प्रवेश मोफत आहे.

कोणतेही विद्यमान तसेच संभाव्य इन्व्हेस्टर्स या सेमिनारमध्ये उपस्थित राहू शकतात.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश असेल.

या आयएपीमध्ये कॅपिटल मार्केट आणि डिमॅटविषयी अधिक जाणून घ्या.

तुमच्यासाठी सर्वोत्तम निवडण्यासाठी आयएपीची विस्तृत यादी तपासा.

## आयएपीचे वेळापत्रक

https://www.cdslindia.com/eservices/Investors/InvestorCorner

कृपया सेबी माहितीपत्रक "सिक्युरिटीज मार्केट: इन्व्हेस्टर्सच्या दृष्टिकोनातून समजून घेणे" डाउनलोड करा

सिक्युरिटीज मार्केटविषयी अधिक मूलभूत माहितीसाठी, खाली क्लिक करा.

https://www.cdslindia.com/downloads/Securities%20Market%20Booklet.pdf

**हे माहितीपत्रक यांनी संयुक्तपणे तयार केले आहे:**
https://www.cdslindia.com/eservices/Investors/InvestorCorner
सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया | सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड | बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेड | नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड | नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि. | मेट्रोपोलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड

**CDSL**
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# सोशल मीडिया उपस्थिती

सीडीएसएलची फेसबुक, लिंक्डइन, एक्स, इंस्टाग्राम आणि यूट्यूब सारख्या सोशल मीडिया साईट्सवर सक्रिय उपस्थिती आहे जिथे ते कॅपिटल मार्केटशी संबंधित माहितीपूर्ण कंटेंट प्रदान करतात.

- https://www.facebook.com/cdslindia/
- https://www.linkedin.com/company/cdslindia/
- https://x.com/cdslindia/
- https://www.instagram.com/cdslindia/
- https://www.youtube.com/@CDSLIndiaLtd/featured

## 5 सोप्या टिप्स

बना #AtmanirbharInvestor

- एक्सप्लोर करा आणि स्वतःचे संशोधन करा.
- जाणून घ्या आणि अपडेटेड राहा.
- गुंतवणूक करण्यापूर्वी जोखमींचे मूल्यांकन करा आणि समजून घ्या.
- संयम आणि लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे!
- सीडीएसएलच्या डिजिटल सेवा जसे की easi/ easiest यांचा लाभ घ्या आणि इन्व्हेस्टर अवेअरनेस प्रोग्राम्स (आयएपी) मध्ये सहभागी व्हा.

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आमच्याशी संपर्क साधा

प्रत्येक आत्मनिर्भर इन्व्हेस्टरसाठी आणि देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी समृद्ध भविष्य निर्माण करण्यास आम्ही उत्सुक आहोत.

## सीडीएसएल प्रादेशिक कार्यालये

### अहमदाबाद
श्री. उत्पल शाह
203/204, अभिश्री ॲव्हेन्यू, 2रा फ्लोअर, नेहरू नगर सर्कल जवळ, एस.एम.रोड, अंबावडी, अहमदाबाद - 380 015, गुजरात.
ईमेल: utpals@cdslindia.com

### बंगळुरू
श्री. सी.एस. हरीशा
सी-02, 2रा फ्लोअर, जैन हाईट्स सोलस 1, जे सी रोड 1ला क्रॉस बंगळुरू - 560 027, कर्नाटक.
ईमेल: csharisha@cdslindia.com

### चेन्नई
श्री. कार्तिक बी
बीएसई इन्व्हेस्टर सर्व्हिस सेंटर "इम्पीरियल" ए - टॉवर्स, 8वा फ्लोअर 610, अन्ना सालई, तेनमपेट, तेनमपेट मेट्रो स्टेशन जवळ, चेन्नई - 600 018
ईमेल: karthikb@cdslindia.com

### हैदराबाद
श्री. शिवा प्रसाद वेनिशेट्टी
101, इम्पीरियल टॉवर, अमीरपेट मेट्रो स्टेशन समोर, अमीरपेट, हैदराबाद - 500 082, आंध्र प्रदेश.
ईमेल: shivap@cdslindia.com

### जयपुर
श्री. यशवंत गुप्ता
कार्यालय नं. 602, 6वा फ्लोअर, केजे सिटी टॉवर, अशोक मार्ग, सी-स्कीम, जयपूर - 302 001, राजस्थान
ईमेल: yashwantg@cdslindia.com

### कोची
श्री. शिबुनाथ टी.
बीएसई इन्व्हेस्टर्स सर्व्हिस सेंटर, श्री लक्ष्मी टॉवर, 2रा फ्लोअर, रवीपुरम रोड, रवीपुरम, एर्नाकुलम, केरळ, पिन कोड - 680 016
ईमेल: shibunatht@cdslindia.com

### कोलकाता
श्री. मोलोय बिस्वास
युनिट नं - ए1 (II) आणि ए1 (III), ब्लॉक - ए, 1ला फ्लोअर, 22 कॅमॅक स्ट्रीट, (अबनींद्रनाथ ठाकूर सारणी), कोलकाता - 700 016, पश्चिम बंगाल.
ईमेल: moloyb@cdslindia.com

### लुधियाना
श्री. इंदरजीत सिंह
214, लुधियाना स्टॉक एक्सचेंज बिल्डिंग, फिरोझ गांधी मार्केट, लुधियाना - 141 001, पंजाब.
ईमेल: inderjitp@cdslindia.com

### नवी दिल्ली
श्री. अमितकुमार जैन
101, 1ला फ्लोअर, अग्रवाल कॉर्पोरेट टॉवर, प्लॉट नं. 23, डिस्ट्रिक्ट सेंटर, राजेंद्र प्लेस, नवी दिल्ली - 110 008.
ईमेल: amitj@cdslindia.com

### पुणे
श्रीमती अश्विनी थोरात
कार्यालय नं. 15, 1ला फ्लोअर, ग्लोबल ट्रेड सेंटर, 1/1, रामबाग कॉलनी, (एचडीएफसी बँकच्या वर), एल.बी.एस मार्ग, नवी पेठ, पुणे - 411 030, महाराष्ट्र.
ईमेल: ashwinit@cdslindia.com

### कानपूर
श्री. देवेश धर दुबे
पदम टॉवर्स-II, 14/113, कॅबिन नं. 369, तिसरा फ्लोअर, सिव्हिल लाईन्स, कानपूर नगर, कानपूर - 208 001, उत्तर प्रदेश.
ईमेल: deveshd@cdslindia.com

### इंदौर
श्री. कृष्णा गुप्ता
320, रत्नमणी कॉम्प्लेक्स, 7/1, न्यू पलासिया, इंदौर - 452 001, मध्य प्रदेश.
ईमेल: krishnag@cdslindia.com

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आमच्याशी संपर्क साधा


**सीआयएन: L67120MH1997PLC112443**

**नोंदणीकृत कार्यालय: सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि.,**
ए-विंग, मॅरेथॉन फ्यूचरेक्स, 25वा फ्लोअर, मफतलाल मिल्स कंपाउंड,
एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - 400 013

**वेबसाईट** - https://www.cdslindia.com/



अस्वीकृती: हे माहितीपत्रक केवळ माहितीच्या उद्देशासाठी आहे आणि वाचकाने अनुसरण करावयाच्या कोणत्याही कृतीवर कोणतेही मत किंवा शिफारस देत नाही. या माहितीपत्रकामध्ये असलेली माहिती विक्री किंवा खरेदी किंवा सेवेची कोणतीही ऑफर नाही किंवा त्याचा भाग नाही किंवा त्याचा तसा अर्थ काढला जाऊ नये. माहितीपत्रकामधील माहिती विश्वसनीय आणि चांगल्या विश्वासार्ह स्त्रोतांकडून घेतली गेली गेली असली तरी, वाचकांनी हे लक्षात ठेवावे की त्यातील मजकूर, ग्राफिक्स, लिंक्स किंवा इतर बाबी कोणत्याही प्रकारच्या हमीशिवाय प्रदान केल्या आहेत.

या माहितीपत्रकाच्या कोणत्याही विशिष्ट उद्देशाच्या अचूकता, शुद्धता, विश्वासार्हता, वेळेची मर्यादा, विक्रीयोग्यता किंवा योग्यतेबद्दलची कोणतीही हमी सीडीएसएल स्पष्टपणे नाकारते. माहितीपत्रकामध्ये समाविष्ट माहिती किंवा डाटाच्या वापराच्या (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष) परिणामी कोणत्याही प्रकारच्या नुकसान किंवा हानीसाठी सीडीएसएल जबाबदार असणार नाही. सीडीएसएलच्या पूर्वसंमतीशिवाय या न्यूजलेटरमध्ये कोणताही बदल किंवा प्रसारण किंवा संपूर्ण न्यूजलेटर किंवा त्याच्या कोणत्याही भागाची छायाप्रत बनवून वितरण करणे किंवा संपूर्ण न्यूजलेटर किंवा त्याच्या कोणत्याही भागाची कोणत्याही स्वरूपात पुनर्निर्मिती करणे प्रतिबंधित आहे.

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आत्मनिर्भर इन्व्हेस्टर्सचे सशक्तीकरण सीडीएसएलच्या

- सुविधाजनक
- विश्वासार्ह
- सुरक्षित

## डिमॅट खात्यांसह

सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ही भारतातील पहिली आणि एकमेव सूचीबद्ध डिपॉझिटरी आहे जी विश्वसनीय आणि सुरक्षित डिजिटल सेवांसह देशभरातील इन्व्हेस्टरना सशक्त बनवण्यासाठी समर्पित आहे




अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# डिमॅट डेबिट आणि प्लेज सूचना (डीडीपीआय)

बना #AtmanirbharInvestor



## काय करावे

- तुमचे डिमॅट खाते ऑपरेट करण्यासाठी पीओए मंजूर करण्यापूर्वी अधिकारांची व्याप्ती आणि परिणाम काळजीपूर्वक तपासा.
- डिमॅट खाते उघडण्यासाठी पीओए अनिवार्य नाही.

## काय करू नये

- तुमच्या ब्रोकरला जनरल पीओए देऊ नका. नेहमी मर्यादित उद्देशाचा पीओए निवडा.
- नॉन-रिव्होकेबल पीओएज देऊ नका. ते तुम्हाला दिलेल्या पीओए नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार देत नाही.

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**

CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आत्मनिर्भर इन्व्हेस्टर्सचे सशक्तीकरण

## आत्मविश्वासू आणि आत्मनिर्भर इन्व्हेस्टर्सच्या राष्ट्राची निर्मिती

- डिमॅट आणि एमएफमधील गुंतवणुकींचे एकत्रित दृश्य.
- डिमॅट किंवा एमएफमध्ये कोणत्याही व्यवहाराच्या बाबतीत मासिक विवरण.
- जर कोणताही व्यवहार नसेल तर अर्ध-वार्षिक होल्डिंग विवरण.
- ईसीएएस सेवा प्राप्त करण्यासाठी तुमच्या डिमॅट खाते/एमएफ फोलिओमध्ये तुमचा ईमेल आयडी आणि सीएएस मोड अपडेटेड ठेवा.

CDSL

INVESTOR PROTECTION FUND TRUST



CDSL
INVESTOR PROTECTION FUND TRUST

# आमच्याशी संपर्क साधा

प्रत्येक आत्मनिर्भर इन्व्हेस्टरसाठी आणि देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी समृद्ध भविष्य निर्माण करण्यास आम्ही उत्सुक आहोत. सहभागी व्हा 3 कोटी आत्मनिर्भर इन्व्हेस्टर्स सोबत

## सीडीएसएल प्रादेशिक कार्यालये

**अहमदाबाद**
श्री. उत्पल शाह
203/204, अभिश्री ॲव्हेन्यू, 2रा फ्लोअर, नेहरू नगर सर्कल जवळ, एस.एम.रोड, अंबावडी, अहमदाबाद - 380 015, गुजरात.
ईमेल: utpals@cdslindia.com

**बंगळुरू**
श्री. सी.एस. हरीशा
सी-02, 2रा फ्लोअर, जैन हाईट्स सोलस 1, जे सी रोड 1ला क्रॉस बंगळुरू - 560 027, कर्नाटक.
ईमेल: csharisha@cdslindia.com

**चेन्नई**
श्री. कार्तिक बी
बीएसई इन्व्हेस्टर सर्व्हिस सेंटर "इम्पीरियल" ए - टॉवर्स, 8वा फ्लोअर 610, अन्ना सालई, तेनमपेट, तेनमपेट मेट्रो स्टेशन जवळ, चेन्नई - 600 018
ईमेल: karthikb@cdslindia.com

**हैदराबाद**
श्री. शिवा प्रसाद वेनिशेट्टी
101, इम्पीरियल टॉवर, अमीरपेट मेट्रो स्टेशन समोर, अमीरपेट, हैदराबाद - 500 082, आंध्र प्रदेश.
ईमेल: shivap@cdslindia.com

**जयपुर**
श्री. यशवंत गुप्ता
कार्यालय नं. 602, 6वा फ्लोअर, केजे सिटी टॉवर, अशोक मार्ग, सी-स्कीम, जयपूर - 302 001, राजस्थान
ईमेल: yashwantg@cdslindia.com

**कोची**
श्री. शिबुनाथ टी.
बीएसई इन्व्हेस्टर्स सर्व्हिस सेंटर, श्री लक्ष्मी टॉवर, 2रा फ्लोअर, रवीपुरम रोड, रवीपुरम, एर्नाकुलम, केरळ, पिन कोड - 680 016
ईमेल: shibunatht@cdslindia.com

**कोलकाता**
श्री. मोलोय बिस्वास
युनिट नं - ए1 (II) आणि ए1 (III), ब्लॉक - ए, 1ला फ्लोअर, 22 कॅमॅक स्ट्रीट, (अबनींद्रनाथ ठाकूर सारणी), कोलकाता - 700 016, पश्चिम बंगाल.
ईमेल: moloyb@cdslindia.com

**लुधियाना**
श्री. इंदरजीत सिंह
214, लुधियाना स्टॉक एक्सचेंज बिल्डिंग, फिरोझ गांधी मार्केट, लुधियाना - 141 001, पंजाब.
ईमेल: inderjitp@cdslindia.com

**नवी दिल्ली**
श्री. अमितकुमार जैन
101, 1ला फ्लोअर, अग्रवाल कॉर्पोरेट टॉवर, प्लॉट नं. 23, डिस्ट्रिक्ट सेंटर, राजेंद्र प्लेस, नवी दिल्ली - 110 008.
ईमेल: amitj@cdslindia.com

**पुणे**
श्रीमती अश्विनी थोरात
कार्यालय नं. 15, 1ला फ्लोअर, ग्लोबल ट्रेड सेंटर, 1/1, रामबाग कॉलनी, (एचडीएफसी बँकच्या वर), एल.बी.एस मार्ग, नवी पेठ, पुणे - 411 030, महाराष्ट्र.
ईमेल: ashwinit@cdslindia.com

**कानपूर**
श्री. देवेश धर दुबे
पदम टॉवर्स-II, 14/113, कॅबिन नं. 369, तिसरा फ्लोअर, सिव्हिल लाईन्स, कानपूर नगर, कानपूर - 208 001, उत्तर प्रदेश.
ईमेल: deveshd@cdslindia.com

**इंदौर**
श्री. कृष्णा गुप्ता
320, रत्नमणी कॉम्प्लेक्स, 7/1, न्यू पलासिया, इंदौर - 452 001, मध्य प्रदेश.
ईमेल: krishnag@cdslindia.com

अधिक माहितीसाठी भेट द्या: **www.cdslindia.com**